# महाराष्ट्र शासन

शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, 17 डॉ. आंबेडकर रोड, पुणे-1

फोन नं. ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ E_mail ID- jdhepune@gmail.com

क्रमांक-विसस/उ/पुवि/2025/पुणे विभाग/दिनांक -२५.०७.२०२५
प्रति,

१. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
२. प्राचार्य/प्राचार्या,
सर्व अशासकीय कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, शिक्षणशास्त्र व समाजकार्य महाविद्यालये
**<u>पुणे / अहमदनगर व नाशिक जिल्हे.</u>**

**विषय - अध्यापकांना सातवा वेतन आयोग लागू करण्यासंदर्भातील दि. ८ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयासोबतच्या Pay Matrix मध्ये अधिकचे टप्पे वाढविण्याबाबत..**

संदर्भ - १. शासन पत्र क्रमांक आस्था-२०२५/प्र.क्र.९६०५८३/विशि-१/ दि. २०.६.२०२५.
२. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. युएनआय / विशि-१/टे.क्र.४०/ई-१९७१३४७ दि. १.७.२०२५.

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन पत्रानुसार कळविण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय दि. ११ सप्टेंबर, २०१९ अन्वये अकृषी विद्यापीठे व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी पदवी व पदविका संस्थेतील शिक्षक व शिक्षक समकक्ष पदांना सातव्या वेतन आयोगाच्या सुधारित वेतन संरचना लागू करण्यात आलेल्या आहेत.

शासन निर्णय दि. ०८ मार्च, २०१९ अन्वये राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील अध्यापकांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे. या मधील Appendix & Pay Matrix टेबलमध्ये Academic Level १३ A आणि Academic Level १४ मध्ये दर्शविण्यात आलेले सेल हे अनुक्रमे १८ (२१७१००) व अनुक्रमे १५ (२१८२००) पर्यंत आहेत.

शासनाने शासन पत्र दि. २० जून, २०२५ अन्वये अशा किती अध्यापकांचे वेतन लेवल १३ ए आणि लेवल १४ च्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहचले असून ते किती वर्षापासून लेवल १३ ए आणि लेवल १४ मध्ये वेतन घेत आहेत याची माहिती सादर करण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार अकृषी विद्यापीठ तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील अध्यापकांची माहिती खालील तक्त्यात सादर करण्यात यावी.

ॲकेडेमिक लेवल १३ ए

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव | कर्मचा-यांचे नांव | पदनाम | ॲकेडेमिक लेवल १३ ए (१३१४००-२१७१००) मध्ये अंतिम टप्प्यापर्यंत कधी पोहचलेले आहेत तो दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

# ॲकेडेमिक लेवल १४

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव | कर्मचा-यांचे नांव | पदनाम | ॲकेडेमिक लेवल १४ (१४४२००-२१८२००) मध्ये अंतिम टप्प्यापर्यंत कधी पोहचलेले आहेत तो दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

वरील विवरणपत्रात नमूद केलेली माहिती माहे जुलै २०२५ ची वार्षिक वेतनवाढ लक्षात घेऊनच अध्यापकांची माहिती शनिवार दिनांक २६.०७.२०२५ रोजी सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत या कार्यालयाच्या ई-मेलवर (Microsoft Excel Sheet) मध्ये तयार करुन (Excel Soft Copy व Hard Copy) सादर करण्यात यावी, याची सर्व आहरण व संवितरण अधिकारी यांनी नोंद घ्यावी.

Signed by
Ashok Uddhav Ubale
Date: 25-07-2025 15:15:23

(डॉ. अशोक उबाळे)
सहसंचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

सोबत - वरीलप्रमाणे संचालनालयाचे परिपत्रक.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,**
**४१२ ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी,शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६**
Web : www.dhepune.gov.in E-mail:vishi.dhepune@nic.in
फोन नं.०२०/२६१२२११९

क्रमांक-युएनआय/विशि-१/टे.क्र.४०/ई-1971374

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य.

**विषय अध्यापकांना सातव्या वेतन आयोग लागू करण्यासंदर्भातील दि.०८ मार्च,२०१९ च्या शासन निर्णयासोबतच्या Pay Matrix मध्ये अधिकचे टप्प वाढविण्याबाबत.**

संदर्भ शासन पत्र क्रमांक आस्था-२०२५/प्र.क्र.९६०५८३/विशि-१ दि.२० जून, २०२५

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भिय शासन पत्राची प्रत सोबत जोडली आहे, कृपया अवलोकनी घ्यावी.

वरील संदर्भिय पत्रानुसार कळविण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय दि.११ सप्टेंबर, २०१९ अन्वये शासकीय व अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी पदवी व पदविका संस्थेतील शिक्षक व शिक्षक समकक्ष पदांना सातवा वेतरन आयोगाच्या सुधारित वेतनसंरचना लागू करण्यात आलेल्या आहेत.

शासन शुद्धीपत्र दि.३० मे, २०२३ अन्वये तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय व अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्थेतील अध्यापकांना सातवा वेतन आयोग लागू करण्याच्या अनुषंगाने दि.११ सप्टेंबर, २०१९ च्या शासन निर्णयातील पे मॅट्रिक्स टेबलमध्ये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. शासन निर्णय दि.११ सप्टेंबर, २०१९ मध्ये Cell No/Level १३ A व १४ मध्ये अधिकचे १० टप्पे वाढवून सुधारित शासन शुद्धीपत्र दि.३० मे, २०२३ अन्वये निर्गमित केलेले आहे.

शासन निर्णय दि.०८ मार्च, २०१९ अन्वये राज्यातील अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील अध्यापकांना सातवा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे. यामधील Appendix १ Pay Matrix टेबलमध्ये Academic Level १३ A आणि Academic Level १४ मध्ये दर्शविण्यात आलेले सेल हे अनुक्रमे १८(२१७१००) व अनुक्रमे १५(२१८२००) पर्यंत आहेत.

त्यामुळे शासन शुद्धीपत्र दि.३० मे, २०२३ अन्वये सुधारित करण्यात आलेले अधिकचे १० टप्पे शासन निर्णय दि.०८ मार्च, २०१९ मध्ये वाढविण्याबाबत शासनास संचालनालयाचे पत्र दि.२९ जानेवारी, २०२४ अन्वये प्रस्तावित केलेले आहे.

शासनाने शासन पत्र दि.२० जून, २०२५ अन्वये अशा किती अध्यापकांचे वेतन लेवल १३ ए आणि लेवल १४ च्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहचले असून ते किती वर्षापासून लेवल १३ ए आणि लेवल १४ मध्ये वेतन घेत आहेत याची माहिती सादर करण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार आपल्या विभागातील अध्यापकांची माहिती खालील तक्त्यात या संचालनालयास सादर करावी.

**विभागाचे नाव-**

| ॲकेडेमिक लेवल १३ ए मध्ये अंतिम टप्यापर्यंत पोहाचलेले अध्यापकांची संख्या | ॲकेडेमिक लेवल १३ ए मध्ये अंतिम टप्यापर्यंत कधी पोहाचलेले आहेत याबाबतची अध्यापकनिहाय यादी | अतिम टप्प्यापर्यंत कधी पोहोचलेले आहे तो दिनांक | ॲकेडेमिक लेवल १४ मध्ये अंतिम टप्यापर्यंत पोहाचलेले अध्यापकांची संख्या | ॲकेडेमिक लेवल १४ मध्ये अंतिम टप्यापर्यंत कधी पोहाचलेले आहेत याबाबतची अध्यापकनिहाय यादी | अतिम टप्प्यापर्यंत कधी पोहोचलेले आहे तो दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| | अध्यापकाचे नाव | | | अध्यापकाचे नाव | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

Signed by
Prakash Dhondu Bachhav
Date: 01-07-2025 06:21:30

**(डॉ.प्रकाश बच्छाव)**
शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१६

प्रत- मा.श्री.सं.रा.उत्तेकर, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर

मंत्रालयीन सेवा
जनहिताय सर्वदा

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.**

ई-मेल.vishi१-hted@mah.gov.in दूरध्वनी क्र.०२२ २२७९३१७४

क्रमांक:- आस्था २०२५/ प्र.क्र. ९६०५८३ /विशि-१ दिनांक:-२० जून,२०२५

प्रति,
संचालक,उच्च शिक्षण,पुणे.

विषय:- अध्यापकांना ७ वा वेतन आयोग लागू करण्यासंदर्भातील दिनांक ०८ मार्च, च्या शासन निर्णया सोबतच्या Pay Matrix मध्ये अधिकचे टप्पे वाढविण्याबाबत.
संदर्भ:-आपले पत्र क्रमांक युएनआय/(९१/२३)/विशि-१ दिनांक २९ जानेवारी,२०२४.

अकृषि विद्यापीठे आणि संलग्नित अनुदानित महाविद्यालयांमधील अध्यापकांना सातव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी लागू करण्यासाठी दि. ०८ मार्च, २०१९ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. तथापि, काही अध्यापकांचे वेतन उपरोक्त दि. ०८ मार्च,२०१९ च्या शासन निर्णयासोबतच्या Appendix I मधील Pay Matrix टेबलमधील लेव्हल १३A आणि लेव्हल १४ च्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहचले आहे, असे आपल्या संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आले आहे. सदर अध्यापकांना त्यापुढील वेतनवाढ देता यावी याकरिता उपरोक्त शासन निर्णयातील Appendix I मधील Pay Matrix मध्ये अधिकचे टप्पे वाढविण्याची बाब विचाराधीन आहे. यास्तव, अश्या किती अध्यापकांचे वेतन लेव्हल १३A आणि लेव्हल १४ च्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहचले आहे तसेच, ते किती वर्षापासून AL१३A व AL१४ मध्ये वेतन वेतन घेत आहेत याची माहिती कृपया सादर करावी.

(सं.रा.उतेकर)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत:- निवडनस्ती, कार्यासन विशि-१